REGISTERED No. B. 3434




# अर्थ

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख १४ सप्टेंबर, १९४९ अंक ३७

श्री — श्री — श्री — श्री — श्री

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

### युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण

**वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.**

**कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.**

**सी. जी. आगाशे आणि कं.,**
मॅनेजिंग एजंट्स.

श्री — श्री — श्री — श्री — श्री

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें

# सोसायट्यांस विनंति

किर्लोस्कर कंपनी सोसायट्यांना ज्या भावांत माल देते त्याच भावांत आम्हीहि नांगर वगैरे माल पुरवितों. आपली कोणतीहि ऑर्डर आपण आमचे मार्फत पाठविण्यानें तोटा नसून फायदाच आहे. सर्व तऱ्हेची सोसायट्यांना लागणारी माहिती व इतरहि माल आम्हीं पुरवितों.

या वर्षीची ऑर्डर आमचे मार्फतच पाठवा.

केळकर बंधु, पुणें व नाशिक.


# विविध माहिती

**मद्रासमधील जमीनदारी**—मद्रास प्रांताच्या सरकारनें ३३ मोठ्या जमीनदारी मालमत्ता जमीनदारी नष्ट करण्याच्या कायद्यान्वयें आपल्या ताब्यांत घेतल्या. त्यांत विजयानगरम् व पिठापुरम् ह्या आंध्रांतील आणि रामनाद व शिवगंगा ह्या तामील नाडमधील मोठाल्या जमीनदाऱ्या आहेत. मद्रास प्रांतांत एकूण २,८०० जमीनदारी आणि ३,५०० इनामी मालमत्ता आहेत. ह्या सर्वांचें मिळून क्षेत्रफळ १ कोटी ४० लक्ष एकरांच्या वर आहे. येत्या दोन-तीन वर्षांत ह्या सर्व जमिनी मद्रास सरकार आपल्या ताब्यांत घेणार आहे. जमीनदारी नाहींशी करण्यासाठीं मद्रास सरकारला जवळ जवळ १५,७५,००,००० रुपये नुकसान भरपाई द्यावी लागेल, असा अंदाज आहे.

**बोनसबाबत करार**—टाटा आयर्न अँड स्टील कं. आणि तिचे कामगार ह्यांच्यांत ३ वर्षे अंमलांत रहाणारा एक बोनस-विषयक करार झाला आहे. कंपनीच्या उत्पन्नांतून घसारा, कर, नफावांटणी आणि व्याज इतक्या बाबींची व्यवस्था केल्यावर उरलेल्या नफ्यापैकीं २७½ टक्के नफा कराराप्रमाणें कामगारांना द्यावयाचा आहे. ३१ मार्च १९४९ रोजीं संपलेल्या वर्षाचा बोनस कामगारांना अद्याप द्यावयाचा आहे. ह्या बोनसची रक्कम ४० लाखांवरून ५५ लाखांवर नेण्यांत आली आहे. बोनसच्या रकमेपैकी २५ टक्के रक्कम प्रॉव्हिडंट फंडाला देण्याचें कलम पहिल्याप्रमाणेंच कायम ठेवण्यांत आलें आहे.

**मुंबई बंदरांत बटाटे नासून वाया गेले**—मुंबई बंदरांत परदेशांतून आयात केलेल्या बटाट्याच्या २०,००० करंड्या फार दिवस पडून राहिल्यामुळें आंतील माल कुजून गेला; अखेर हे सर्व बटाटे समुद्रांत फकून देण्यांत आले. हे बटाटे इटलीहून आणण्यांत आले होते आणि ते बोटींवरच नासले होते, असें पोर्ट ट्रस्टच्या अधिकाऱ्यांचें म्हणणें आहे. पोर्ट ट्रस्टवर कामगारांचे प्रतिनिधी म्हणून काम करणारे श्री. दिनकर देसाई, हे ट्रस्टींच्या पुढील बैठकींत ह्या प्रकरणाची चौकशी व्हावी असा ठराव आणणार आहेत.

**बोकारो येथील धरण**—दामोदर नदीच्या खोऱ्यांत बांधण्यांत यावयाच्या बोकारो धरणाच्या योजनेची आर्थिक आणि तांत्रिक दृष्ट्या पहाणी करण्यासाठी इंटरनॅशनल बँकेनें मि. स्पॉटसवुड ह्या तज्ज्ञाला मुद्दाम पाठविलें होतें. त्यांचा अहवाल बँकेला लवकरच सादर करण्यांत येईल. हें धरण आशियांत सर्वांत आधुनिक पद्धतीचें होईल असें त्यांचें मत असल्याचें समजतें. दामोदर नदी कामीं लावण्याच्या एकंदर योजनेबद्दहि त्यांचें मत अनुकूल झालें आहे, असा अंदाज आहे.

**तुंगभद्रेवरील धरण**—तुंगभद्रा नदीवरील धरणाच्या कामाला नुकताच प्रारंभ करण्यांत आला आहे. तुंगभद्रेच्या पाण्याचा पूर्ण उपयोग करून घेण्याची कल्पना बरीच जुनी, म्हणजे ४४ वर्षांपूर्वीची आहे. तथापि, धरणाची सध्याची योजना १९४४ सालीं प्रथम पुढें आली. ह्या योजनेप्रमाणें होणाऱ्या धरणाच्या पाण्याचा उपयोग मद्रास प्रांत आणि हैद्राबाद संस्थान ह्या दोघांनाही सारखा करता येणार आहे.

**वहातुकीच्या राष्ट्रीयीकरणामुळें तोटा**—ब्रिटिश सरकारनें रेल्वे, रस्ते, गोद्या आणि कालवे या मार्गांनीं होणारी वहातूक राष्ट्राच्या मालकाची केल्याला एक वर्षाचा काळ लोटला. ह्या पहिल्या वर्षांत ब्रिटिश सरकारला त्यामुळें ४७,३३,००० पौंड तोटा आला आहे. १९४८ अखेरच्या ट्रॅन्सपोर्ट कमिशनच्या अहवालांत, परिस्थिति असमाधानकारक आहे असें म्हटलें असून १९४९ अखेर ती अधिकच बिघडेल असें भाकित केलें आहे.

**मुंबई प्रांतांत तागाची लागड**—मुंबई प्रांताच्या शेतकी खात्यानें प्रांतांत तागाची लागवड करण्याचे प्रयोग चालविले होते. हे प्रयोग कितपत यशस्वी झाले आहेत ते पहाण्यासाठी हुगळी येथील शेती संशोधन संस्थेचे संचालक डॉ. कुंडू हे प्रांतांत हिंडणार आहेत. ठाणें, साष्टी, पुणें, रत्नागिरी, सुरत इत्यादि ठिकाणीं हुगळीहून तागाचें बीं आणून त्याची प्रयोगादाखल मुद्दाम लागवड करण्यांत आली होती.

**अमेरिकन गृहिणी घराबाहेर किती काम करतात?**—अमेरिकेंतील विवाहित स्त्रियांपैकी ¼ पेक्षां कमी स्त्रिया घराबाहेर कामें करतात असा अंदाज मेट्रोपॉलिटन विमा कंपनीनें केला आहे. असें असलें तरी पूर्वीपेक्षा अधिक अमेरिकन गृहिणी हल्लीं घराबाहेर काम करूं लागलेल्या आहेत. अमेरिकेंतील चलनवृद्धि आणि महागाई ह्यामुळें घरखर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी अधिकाधिक स्त्रियांना घराबाहेर काम करावें लागत असणें संभवनीय आहे.

**दिल्लींत येणाऱ्या उतारूंवर कर**— विमानानें, आगगाडीनें अगर रस्त्यानें दिल्लींत येणाऱ्या उतारूंकडून कर घेण्यांत यावा असा ठराव दिल्ली नगरपालिकेनें एकमतानें मंजूर केला आहे. सांडपाण्याची व्यवस्था, आरोग्य, इत्यादि सार्वजनिक सुखसोयींच्या खर्चांत वाढ झाल्यामुळें नगरपालिकेच्या बऱ्याच सभासदांनीं ह्या कराला आपली संमति दिली. ह्या कराला हिंद सरकारची मंजुरी मिळविण्यासाठी दिल्लीच्या चीफ कमिशनरनें वाटाघाटी कराव्या अशी विनंति त्याला करण्यांत आली आहे.

**तांदुळाची आयात**—गेल्या कांहीं वर्षांतील सर्वांत अधिक, म्हणजे ८,००,००० टन तांदुळाची आयात हिंदुस्थान ह्यावर्षी करणार आहे. हिंदुस्थानांत २ कोटी टन तांदूळ पिकतो. ह्या उत्पादनाशीं तुलना करता ८,००,००० टन तांदूळ म्हणजे कांहीं फार नाहीं. तांदूळ खाणाऱ्या प्रांतांनीं आपल्या आहारांतील तांदुळाचें प्रमाण थोडेसें कमी केलें तरी सुद्धा हिंदुस्थान तांदुळाच्या बाबतींत स्वयंपूर्ण होऊं शकेल असा अंदाज करण्यांत आलेला आहे. ह्या वर्षीच्या पहिल्या सहा महिन्यांत ५,४०,००० टन तांदूळ आयात करण्यांत आला आणि त्यासाठी २९·८ कोटी रुपये द्यावे लागले. ह्याच काळांत १२,३१,००० टन गहूं आयात करण्यांत आला. त्यासाठी ४६·७ कोटी रुपये किंमत द्यावी लागली. ह्यावरून तांदुळाची आयात कमी करण्यांत आली तर दुर्मिळ अशा डॉलर्सची बरीच बचत होण्यासारखी आहे हें दिसून येतें.

## क्लिअरिंग हाऊसच्या नियमाचा गैर फायदा

### बनवाबनवी उघडकीस आली

राऊत हा नॅशनल सिक्युरिटी बँक, मुंबई, येथें क्लिअरिंग क्लार्क होता. त्यानें काळबादेवी येथील गडोडिया बँकेंत "ए. के. सयद" ह्या खोट्या नांवानें एक खातें उघडलें. त्याचप्रमाणें, सेंट्रल बँकेंतहि "मेघराज सी. त्रिवेदी" ह्या खोट्या नांवानें त्यानें खातें उघडलें. त्यानें गडोडिया बँकेवर १०,००० रुपयांचा एक ह्याप्रमाणें दोन चेक लिहिले आणि सेंट्रल बँकेंत "त्रिवेदी"च्या खात्यांत भरण्यासाठी त्या बँकेकडे दिले. पंजाब नॅशनल बँक ही गडोडिया बँकेची क्लिअरिंग एजंट म्हणून काम करीत होती, तिचे मार्फत क्लिअरिंग-साठी हे दोन चेक आले. नॅशनल सिक्युरिटी बँकेचेहि (जीमध्यें राऊत काम करीत होता, तिची) पंजाब नॅशनल बँक ही क्लिअरिंग एजंट होती. २६ सप्टेंबर रोजीं त्याचे दोन चेक क्लिअरिंग हाऊसमध्यें आल्यावर राऊतनें ते दाबून ठेवले. नंतर दोन दिवसांनीं त्यानें सेंट्रल बँकेंतून २०,००० रुपये काढले आणि बँक ऑफ इंडियांत "मोहन कुमार हरिश्चंद्र" ह्या खात्यांत भरले.

क्लिअरिंग हाउसच्या एका नियमाचा फायदा घेऊन राऊत अशा रीतीनें फसवणूक करूं शकला. पहिल्या क्लिअरिंगला दाखल केलेला चेक त्याच दिवशींच्या स्पेशल क्लिअरिंगच्या वेळेचे अगोदर परत करण्यांत आला नाहीं किंवा नापास करण्यांत आला नाहीं तर खात्यांत पैसे जमा करावयाचे, असा तो नियम आहे. गडोडिया बँकेनें आतां पंजाब नॅशनल बँकेवर दावा लावून, गडोडिया बँकेच्या नांवें निष्कारण २०,००० रु. टाकल्याबद्दल भरपाई मागितली आहे. इकडे, राऊतला मेटर बॉंबच्या सेशन्स कोर्टानें दोषी ठरवून कैदेची व दंडाची शिक्षा दिली आहे.

### स्टँप बाँडचा फसवणुकीसाठी उपयोग

मुंबई येथील लोटस आर्ट प्रॉडक्शन्सच्या मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. मिस नौरोजी ह्यांना ५० हजारांचें कर्ज देवविण्याची थाप देऊन दोघांनीं त्यांचेकडून १,००० रुपये लांबविल्याची तक्रार पोलिसांकडे नोंदविण्यांत आली आहे. दोघा जणांनीं कर्जाची व्यवस्था केली असल्याचें डॉ. नौरोजी ह्यांना सांगून १ हजार रुपयांचे स्टँप बाँड खरीदण्यास त्यांस सुचविलें. जव्हेरी नांवाचा मनुष्य कर्ज देणार होता, त्याच्या नांवें स्टँप बाँड आणण्यांत आले. ते स्टँप बाँड डॉ. नौरोजींनीं कराराचा मसुदा लिहिण्या-साठी आरोपींना दिले. परंतु आरोपी स्टँप बाँड घेऊन गेले ते परत आलेच नाहींत. त्यांनीं दिलेल्या पत्त्यावरहि त्यांचा तपास लागला नाहीं. चौकशी अंतीं, आरोपींनीं जनरल स्टँप कचेरींत स्टँप बाँड परत करून त्यांचा रिफंड घेतल्याचें कळलें.

**जागतिक शांततेसाठीं नवें पाक्षिक**—जागतिक शांततेच्या रक्षणाचा पुरस्कार करणारें एक पाक्षिक पॅरीसें येथून लवकरच प्रसिद्ध होऊं लागणार आहे. वर्ल्ड कॉंग्रेस ऑफ दि पार्टिझन्स ऑफ पीस ह्या संघटनेतर्फे तें प्रकाशित करण्यांत येणार असून त्याच्या आवृत्त्या इंग्लिश, फ्रेंच, इटालिअन, जर्मन, रशिअन आणि स्पॅनिश इतक्या भाषांतून निघणार आहेत.

**जर्मन शोधांना हिंदचें संरक्षण**—नवीं जर्मन पेटंट्स, डिझाइन्स, ट्रेडमार्क्स आणि कॉपिराइट ह्यांना हिंदनें इतर १३ राष्ट्रां-बरोबर संरक्षण द्यावयाचें ठरविलें आहे, असें समजतें.

कंपनीचे अध्यक्ष म्हणाले:—

### वनस्पतिविरुद्ध प्रचार

"वनस्पति आणि तूप ह्यांचेमधील तौलनिक सकसपणासंबंधीं गेल्या कांहीं वर्षांत पुष्कळच आग्रही चर्चा झाली आहे. शुद्ध तूप हें सरस आहे, असें गृहीत धरूनहि मी म्हणतों कीं, एकूण लोक-संख्येच्या बऱ्याच मोठ्या भागास पसंत पडेल अशा स्वरूपांत वनस्पतीनें खाद्य स्निग्ध पदार्थ पुरविला आहे. निर्लज्जपणें भेसळ केल्याविना, ह्याची मागणी पुरविणें डेअरीवाल्यांना कधींच शक्य झालें नसतें. इतर देशांतील डेअरीवाल्यांनीं मार्गराइनविरुद्ध वावटळ उठवली त्याच प्रकारचा वनस्पतीविरुद्ध हा प्रचार आहे. ज्या देशांत दूध, लोणी, इत्यादींचें उत्पादन सबंध लोकसंख्येला पुरेल इतकें होतें, त्यांनीं स्निग्ध अन्न देणाऱ्या दुसऱ्या जिनसांस बंदी केली, तर गोष्ट वेगळी. आपल्या देशांत जनतेला दूध जेथें अजिबात मिळत नाहीं आणि तुपाचा पुरवठा अपुरा आहे, तेथें स्निग्ध अन्न देणारा वनस्पतीसारखा दुसरा जिन्नस लोकांना मिळूं न देण्याचा प्रयत्न करणें म्हणजे वस्तुस्थितीला तोंड देणें टाळण्यासारखें आहे." सर जे. आर. डी. टाटा

टाटा ऑइल मिल्स कं. लि.

कंपनीचे अध्यक्ष म्हणाले:—

### नफ्याखेरीज कारखानदारी अशक्य

"कार्यक्षमता वाढविण्याचा कारखानदारांना एकसारखा आग्रह करण्यांत येतो, परंतु त्याबरोबरच येणाऱ्या अडचणींकडे मात्र दुर्लक्ष केलें जातें. कार्यक्षमता वाढून कारखान्यांची भरभराट झाली तर भागीदारांचा फायदा झालाच पाहिजे—एका दृष्टिकोना-प्रमाणें भागीदारांना विचारण्याचें कारण नाहीं—आणि कामगार व सर्वसाधारण जनता ह्यांचेंहि हित साधलें पाहिजे (ह्याचेशीं आम्ही सहमत आहोंत). कार्यक्षमता व भरभराट ह्यांतून नफा निर्माण झाला पाहिजे. परंतु नफा उरला कीं त्याचा मोठा हिस्सा कर खाऊन टाकतो आणि नफा मिळविणें ह्यावरच टीका होते. कार्यक्षम कारखान्यांचा पैसा कर शोषून घेतो आणि त्यांतून कार्यक्षम नसणारांना पोसलें जातें. चढीच्या किंमतीच्या सध्याच्या काळांत कारखान्यांचा पैसा कारखान्यांतच मुरणें वास्तविक अत्यंत आव-श्यक आहे. झिजून नष्ट झालेली मालमत्ता पुनः उभी करण्यास नवी गुंतवण लागते ती फक्त नफ्यानेंच आकर्षित होऊं शकते. नफ्याखेरीज कारखानदारी अशक्यप्राय आहे."

हेन्री सालमन

जे. लॉयन्स आणि कं. लि. (ब्रिटन)

**मंदीविरुद्ध ऑस्ट्रेलिआची दक्षता**— ऑस्ट्रेलिआंत पुन्हां मंदीची लाट उसळून बेकारी वाढूं लागल्यास ६० कोटी पौंड खर्चून सार्वजनिक उपयोगाचीं अनेक कामें सुरू करण्याचें तेथील मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. मंदीविरुद्ध तयार ठेवलेल्या ह्या कार्यक्रमांत शाळा, इस्पितळें, घरें, रस्ते, पाटबंधारे, रेल्वे, विजेचीं उत्पादन केंद्रें, इत्यादि अनेक प्रकारचीं बांधणीचीं कामें समाविष्ट करण्यांत आलीं आहेत.

**विजेच्या केंद्रासाठीं युरोपांतील सर्वांत मोठा बोगदा**—नॉर्वेमधील एका वीज-निर्मितीच्या केंद्रासाठी २३·६ किलोमीटर लांबीचा बोगदा खोदण्यांत येत आहे. हा बोगदा युरोपांत सर्वांत अधिक लांबीचा आहे असें म्हणतात. बोगद्यांतून दक्षिण नॉर्वेतील एका वीज-निर्मितीच्या केंद्राला पाण्याचा पुरवठा करण्यांत येणार आहे.

## पैशाच्या पुरवठ्याची परिस्थिति

शेतीचीं पिकें तयार होऊन पशास मोठी मागणी सुरू होण्यास आतां फारसा अवकाश राहिलेला नाहीं. चालू वर्षी पाऊस साधारणतः समाधानकारक झालेला असल्यामुळें शेतीचें उत्पादन वाढण्याचा संभव आहे. तो खरा ठरल्यास, पैशास मागणी ज्यास्त येणें क्रमप्राप्तच आहे. साखरेसारख्या कांहीं जीवनोपयोगी जिनसांच्या किंमती उतरविण्याचा प्रयत्न सरकारनें चालविला आहे, तो कितपत यशस्वी होईल हें आज सांगतां येणें कठीण आहे. परंतु, त्याच्या यशाचे प्रमाणांत पैशावरील ताण कमी होईल, हें उघड आहे. ऑगस्ट, १९४९ अखेर शेड्यूल्ड बँकांनीं दिलेल्या कर्जाची रक्कम ४०० कोटी रुपये होती. मे, १९४९ मधील ५०० कोटींच्या आकड्यापेक्षा हा आकडा १०० कोटींनीं लहान असला तरी ऑगस्ट, १९४८ अखेरशीं तुलना करता एका वर्षापूर्वी इतकीच बँकांची रक्कम आज कर्जात गुंतलेली आहे असें दिसून येतें. परंतु, येत्या सहा महिन्यांत परिस्थिति गेल्या वर्षीच्या तत्सम सहा महिन्यांपेक्षा वेगळीं राहील, असा अंदाज करण्यांत येत आहे. ह्याचें एक प्रमुख कारण म्हणजे ओपन जनरल लायसेन्स खालीं अनिर्बंध आयात गेल्या वर्षी झाली ती आतां बंद असल्यामुळें त्या व्यवहारास पूर्वीसारखा पैसा लागण्याचें कारण राहिलेलें नाहीं; मर्यादित स्वरूपांतच तो लागेल. सरकारच्या नव्या धोरणाचा हा एक परिणाम होईल. रिझर्व्ह बँकेजवळील शेड्यूल्ड बँकांच्या ठेवी घटत चालल्या होत्या, परंतु आतां त्या ठेवींची रक्कम ९० कोटी रुपये झाली आहे; म्हणजे ऑगस्ट १९४९ अखेरच्या ठेवी इतकीच ती सुमारें आहे. ह्या सर्व गोष्टींवरून, पैशाच्या पुरवठ्याची परिस्थिति गेल्या वर्षअखेर जितकी वाईट होती तेवढी वाईट राहणार अशी आशा व्यक्त करण्यांत येत आहे. मध्यवर्ती सरकारच्या ट्रेझरी बिलांत बँका ½% दरानेंहि पैसे गुंतवीत आहेत आणि अशा प्रकारच्या गुंतवणुकीस इतका अल्प दर जगांत इतर ठिकाणीं क्वचितच आहे, हें खरें असलें तरी इतर कामासहि मुबलक पैसा उपलब्ध होईल, असा त्याचा अर्थ कोणीच करीत नाहीं. आर्थिक व औद्योगिक प्रश्न सोडविण्यांत सरकारला कितपत यश येतें, ह्यावर बरचें अवलंबून आहे, हें उघड आहे.

---


## Bombay Provincial Co-Operative Institute

Applications for the posts of Co-operative Training Inspectors to work in the District of Maharashtra and Gujarat are invited from persons who are at least Matriculates with experience of the working of the Co-operative Movement. Persons with higher educational qualifications, possessing experience in propaganda and educational work of the Co-operative Movement will be preferred. The appointment will be on the scale of Rs. 75-5-95 E. B. 7-130 plus such dearness allowance as may be sanctioned from time to time. Applications giving full details regarding age, educational qualifications, regional languages known, practical experience in Co-operation etc., should be sent so as to reach the Honorary Secretary, 9, Bakehouse Lane, Fort Bombay 1, on or before the 17th September 1949.


## पुणें सें. को. बँक लि., पुणें

### शाखा कचेऱ्यांसाठी इमारतीः खेड बँकेचा रौप्य महोत्सव

अहवालाचे वर्षी बँकेच्या ११ शाखा व १ उपशाखा मिळून १२ शाखा चालू होत्या. बँकेला जोडलेल्या सोसायट्यांची संख्या ५०२ असून त्यापैकी शेतकी चालू ३५८ व रद्द २६ आणि बिगर–शेतकी चालू १११ व रद्द ७ अशा आहेत. अहवालाचे सालीं बिगर शेतकी २६ व शेतकी ३० अशा ५६ नवीन सोसायट्या बँकेच्या भागीदार झाल्या आहेत. चालू सोसायट्यांकडे कर्जाची बाकी ११,६४,२१७ रु. आहे. सेफ डिपॉझिट व्हॉल्ट वाढवून लॉकर कॅबिनेटसची संख्या वाढविण्यांत आली आहे. बँकेनें भांडवलांत व डायरेक्टरांचे संख्येंत वाढ करण्याचें ठरविलें असून लायक शेतकऱ्यांना कर्ज देण्याचेंहि ठरविलें आहे. जिल्ह्यांत ठिकठिकाणीं ज्या शाखा-कचेऱ्या आहेत, त्या त्या जागीं बँकेच्या इमारती बांधण्यासाठी दरसाल नफ्यांतून कांहीं रक्कम बाजूस काढण्याचें धोरण चालू वर्षी अंमलांत आणलेलें आहे. भोर, पौड, वडगांव (मावळ), वेल्हे, लोणावळा ह्यापैकी कांहीं ठिकाणीं शाखा कचेऱ्या उघडण्याचा बँकेचा विचार आहे. बँकेची खेड शाखा ही पहिली शाखा १९२६ सालीं सुरू झाली. मे १९५१ मध्यें तिचा रौप्यमहोत्सव होईल, त्याच्या खर्चासाठी चालू नफ्यांतून महोत्सव फंडाकरितां १,२८८ रु. बाजूस काढण्यांत आले आहेत. बँकेच्या ताळेबंदाची बेरीज १ कोटी, ६५ लक्ष रुपये झाली आहे. बँकेस ६६,८४४ रु. निव्वळ नफा झाला. त्यांतून २५,००० रु. चा विनियोग ६¼% डिव्हिडंड देण्याकडे केला जाईल. (चेअरमनः श्री. य. घों. ओगले; मॅ. डायरेक्टरः श्री. द. दि. चितळे.)

---

### सोसायट्यांच्या डिव्हिडंडवर मर्यादा : २४ वा नवा कानू

कोणतीहि सहकारी सोसायटी ह्यापुढें भागीदारांना कोणत्याहि वर्षी ६¼% पेक्षा ज्यास्त डिव्हिडंड देऊं शकणार नाहीं. मुंबई सरकारनें त्याप्रमाणें सहकारी कानूंत दुरुस्ती केली आहे. कंझ्यूमर्स, प्रोड्यूसर्स, हौसिंग किंवा फार्मिंग सोसायटी जर ४% डिव्हिडंड देऊं शकली नाहीं, तर ती पुढील वर्षाच्या नफ्यांतून मागील बाकी डिव्हिडंड देऊं शकेल. मात्र १० वर्षांचे आंत ही बाकी दिली पाहिजे. सोसायटी दरवर्षी आपल्या नफ्यांतून वसूल भांडवलाच्या २% पर्यंत रक्कम बाजूस काढून ती डिव्हिडंड इक्वलायझेशन फंडांत वर्ग करूं शकेल. वसूल भांडवलाच्या ६¼% पर्यंत रक्कम साठेपर्यंत असें करतां येईल. रजिस्ट्रारच्या लेखी मंजुरीशिवाय ह्या फंडांतून पैसे काढून त्याचे डिव्हिडंड वाटणखेरीज दुसरें कांहींहि करता येणार नाहीं.

---


## नोटीस

सातारा जिल्हा को–ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि. कराडची चौदावी वार्षिक साधारण सभा रविवार ता. २५ सप्टेंबर १९४९ रोजीं दुपारीं २ वाजतां श्रीमंत आ. ना. कल्याणी यांचे कराड येथील नव्या इमारतीमध्यें भरणार आहे. त्या वेळीं सभेंत खालीलप्रमाणें कामें होतील:—

मागील सभेचें प्रोसिडिंग, १९४८–४९ चा अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रक तयार करणें, पोट नियम दुरुस्ती करणें, इत्यादि कामें होतील. तरी कर्जदार व बिगर कर्जदार सभासदांनीं या सभेस जरूर हजर रहावें अशी विनंति आहे.

M. S. Putani
मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. १४ सप्टेंबर, १९४९



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


## 'ईस्टर्न एकॉनॉमिस्ट'ची उत्पादन–वाढीची पंच-वार्षिक योजना

दुसरें महायुद्ध संपण्यापूर्वी सुप्रसिद्ध टाटा-बिर्ला किंवा 'मुंबई योजना' या नांवानें ओळखली जाणारी युद्धोत्तर पुनर्घटनेची योजना प्रसिद्ध होऊन पुष्कळांचें मन आकर्षित झालें. सरकारनेंहि सर अर्देशीर दलाल यांच्या नेतृत्वाखाली पुनर्घटनेचा कांहीं कार्य-क्रम तयार केला होता. कॉंग्रेसनें महायुद्धापूर्वींच नेमलेल्या नॅशनल प्लॅनिंग कमिटीतर्फे कांहीं माहिती प्रसिद्ध केली होती. लोक-योजना व आगरवाल–योजना याहि पण बाहेर आल्या. १९४४ व १९४५ सालीं युद्ध संपण्यापूर्वी व नंतर थोडे दिवस पुनर्घटनेच्या योजनांनीं वातावरण भारून गेलें होतें. परंतु नंतर जो अनुभव आला तो असा कीं यापैकी एकहि योजना अंमलांत येऊं शकली नाहीं, व ऑगस्ट १९४७ नंतर तर पाकिस्तानच्या निर्मितीमुळें ह्या सर्व योजना निरुपयोगी ठरल्या. योजना आंखणें सोपें असतें परंतु योजनेच्या अंमलबजावणीच्या मार्गांत हिंदसारख्या औद्योगिक दृष्ट्या प्राथमिक अवस्थेंत असलेल्या देशांत अडचणींचे डोंगर उभे राहातात हें लक्षांत घेऊन, दिल्लीच्या 'ईस्टर्न एकॉनॉमिस्ट' ह्या पत्रानें उत्पादन–वाढीची एक पंचवार्षिक १९५० ते १९५५ पर्यंतची योजना सरकारला सादर केली आहे. ह्या योजनेचें वैशिष्ट्य हें कीं ही योजना व्यावहारिक स्वरूपाची असून अगदी स्पष्ट आहे, व योजना आंखतांना गेल्या दोन वर्षांतील बिकट आर्थिक परिस्थिति लक्षांत घेतली आहे. योजनेचा कार्यक्रम कोणत्याहि रीतीनें डोळे दिपवून टाकणारा नाहीं. १९४८–४९ चें राष्ट्रीय उत्पन्न १०० मानलें तर राष्ट्रीय उत्पन्नांत दर वर्षी फक्त २·५ टक्के वाढ योजिली असून १९५५ अखेर एकंदर राष्ट्रीय उत्पन्नांत वाढ १२॥ टक्के व्हावयाची आहे. १२ ऑगस्टला स्वातंत्र्य–दिनानिमित्त विशेष अंक काढून त्या अंकांत 'ईस्टर्न एकॉनॉमिस्ट'नें ही पंच–वार्षिक योजना स्पष्ट मांडली आहे. ह्या योजनेचा थोडक्यांत सारांश येथें दिला आहे.

आर्थिक जीवनांचें कृषिविषयक उत्पादन, औद्योगिक उत्पादन, व इतर तऱ्हेनें मिळणारें उत्पादन असे सोईसाठी तीन विभाग पाडले आहेत. १९३६–३९ या काळांतील वार्षिक कृषिविषयक उत्पादन १०० मानलें तर १९४३–४४ सालीं त्या उत्पादनानें १०६ हा उच्चांक गांठला, परंतु १९४७–४८ सालीं तें फक्त ९७ होतें. १९३९ चें औद्योगिक उत्पादन १०० मानलें तर १९४३–४४ सालीं ह्या उत्पादनानें १२६·८ हा उच्चांक गांठला, परंतु १९४८ सालीं तें ११८ झालें. व्यापारी उलाढालींचा आंकडा १९४५–४६ सालीं ११९·७ होता तो गेल्या वर्षी १०९·७ झाला. याप्रमाणें आर्थिक जीवनाच्या प्रत्येक बाबतींत गेलीं दोन वर्षें पिछेहाट होत आहे. दोन वर्षांत हिंद सरकारची रिझर्व्ह बँकेकडील ठेव रु. ३५७ कोटींपासून सध्यां रु. १२५ कोटींपर्यंत उतरली आहे. हिंद सरकारचा मुलकी खर्च १९३९ सालीं रु. १० कोटी होता तो सध्यां रु. ४० कोटी झाला आहे. गेलीं २ वर्षें हिंदच्या आर्थिक जीवनाला ओहोटी लागली आहे. तेव्हां १९४३–४४ चा आर्थिक जीवनाचा उच्चांक पुनः गांठण्याचा प्रयत्न केला पाहिजे. गेल्या दोन वर्षांत प्रत्यक्ष आलेला अनुभव जमेस धरूनच योजनेची आंखणी करण्यांत आली आहे. ही योजना पंडित नेहरूंनीं स्वीकारावी व तिची अंमलबजावणी करावी अशी इच्छा व्यक्त केली आहे.

ह्या पंचवार्षिक योजनेप्रमाणें शक्य होणारी उत्पादन-वाढ पुढील कोष्टकांत दाखविली आहे.

| | १९४८-४९ | १९५४-५५ |
|---|---|---|
| | रु. | रु. |
| प्राथमिक स्वरूपाचें उत्पन्न ... | २४७८ कोटी | २९३१ कोटी |
| औद्योगिक उत्पन्न ... | ११५४ कोटी | १३६७ कोटी |
| इतर सर्व प्रकारचें उत्पन्न ... | ९९९ कोटी | १११८ कोटी |

दर माणशीं निरनिराळया प्रकारचें वार्षिक उत्पन्न

| | १९४८-४९ | १९५४-५५ |
|---|---|---|
| | रु. | रु. |
| प्राथमिक व्यवसायांतील ... | १४८ ...... | १६३ |
| औद्योगिक व्यवसायांतील ... | ३८५ ...... | ४२५ |
| इतर प्रकारच्या व्यवसायांतील | १९२ ...... | २०० |

१९४९ च्या बाजारभावांप्रमाणें शेतीच्या उत्पादनांत रु. ३६० कोटींची वाढ, औद्योगिक उत्पादनांत रु. २०० कोटींची वाढ व इतर तऱ्हेच्या उत्पादनांत रु. १२० कोटी याप्रमाणें पांच वर्षांच्या शेवटी वाढ होईल. तीनहि तऱ्हेचें उत्पादन वाढेल अशी अपेक्षा आहे, व प्रत्येकाच्या हातांत येणारें उत्पन्न वस्तूंच्या स्वरूपांतहि वाढूं शकेल. ह्या योजनेमुळें जास्त लोकांना कामधंदा मिळूं शकेल.

शेतीच्या बाबतींत पाणीपुरवठ्याच्या निरनिराळ्या योजनांनीं पांच वर्षांत तीस लक्ष टन धान्य जास्त मिळूं शकेल, व नवीन जमिनी लागवडीस आणून १० लक्ष टन उत्पादन वाढेल. यापैकी २५ लक्ष टन तांदुळाच्या उत्पन्नांत सुधारणा होईल, व १५ लक्ष टन गव्हाचें उत्पन्न वाढेल. प्रत्येक प्रांतामध्यें कोणतें पीक किती प्रमाणांत व कोणत्या कारणामुळें वाढूं शकेल हें सविस्तर दाखविलें आहे.

ऐन युद्ध–काळांत १९४४ सालीं औद्योगिक उत्पादनानें उच्चांक गांठला होता. पुढील पांच वर्षांत प्रत्येक उद्योगधंद्याचें उत्पादन कसें वाढूं शकेल हें खालील कोष्टकांत दाखविलें आहे.

| | वर्ष | वर्ष |
|---|---|---|
| धंद्याचें नांव | १९४८–४९ | १९५४–५५ |
| कापड (सर्व प्रकार) | ५५० कोटी वार | ६६० कोटी वार |
| पोलाद | ८६० हजार टन | १८०० हजार टन |
| सिमेंट | १९ लक्ष टन | ४२ लक्ष टन |
| कागद | १ लक्ष टन | १ लक्ष, ६० हजार टन |
| कोळसा | ३ कोटी टन | ३ कोटी, ६० लक्ष टन |
| मशीन टूल्स | २००० नग | २४,००० नग |
| खतें | ... | ३ लक्ष, ५० हजार टन |

वरीलप्रमाणें प्रत्येक उत्पादनांत वाढ झाली म्हणजे १९३९ चें उत्पन्न १०० समजल्यास, १९४९ चें उत्पन्न ११४ व १९५४ चें उत्पन्न १३५ ह्याप्रमाणें असेल.

मजुरांच्या वेतनाच्या बाबतींत राहावयास घरें बांधून देणें, कामावर असणारांच्या संख्येंत वाढ, मजुरांच्या खऱ्या पगारांत वाढ, सुधारणेमुळें कांहीं मजूर बेकार झाल्यास त्यांना तावडतोब काम मिळवून देण्याची योजना इ. गोष्टींवर भर दिला आहे.

रेल्वेच्या वहातुकीच्या बाबतींत पांच वर्षांच्या अखेर वीस टक्के सुधारणा होईल अशी अपेक्षा आहे. पांच वर्षांच्या अखेर निरनिराळ्या सुधारणांनीं रेल्वेचें उत्पन्न ४१ कोटी ५० लक्ष रुपयांनीं वाढेल, परंतु तेवढ्या काळांत खर्चांतहि १७ कोटी रुपयांची वाढ झाल्यामुळें निव्वळ उत्पन्न २४ कोटी ५० लक्ष रुपयांनीं वाढेल. साध्या रस्त्यांची वाढ करण्यासाठी पुढील पांच वर्षांत २५ कोटी रुपये खर्च करावे लागतील.

ह्या पंचवार्षिक योजनेसाठीं खर्च करावा लागणारा पैसा कोठून मिळवावयाचा हा महत्त्वाचा प्रश्न आहे. पुढील पांच वर्षांत कस्टम्स व प्रातीवरील व तत्सम कर यांचें उत्पन्न मोठ्या प्रमाणांत घटणें संभवनीय आहे, परंतु पोस्ट व तार आणि रेल्वे ह्या खात्यांचें उत्पन्न थोडेसें वाढेल, राज्यव्यवस्था—खर्चांत थोडी काटकसर करतां येईल, लष्करी खर्चांत बरीच काटकसर शक्य आहे व अन्नधान्याच्या आयातीवरील खर्च बराच कमी होईल. याच काळांत किंमती वाढतां कामा नयेत, तर त्या उतरण्यावरच भर पाहिजे. पुढील पांच वर्षांत आंतरराष्ट्रीय चलन निधि, अमेरिकेची एक्सपोर्ट-इंपोर्ट बँक, व जागतिक बँकेकडून मिळूं शकणारें कर्ज मिळून एकंदर ५० कोटी डॉलर्स किंवा रुपये २६६ कोटी, ६६ लक्ष रुपये उभारतां येतील. जनतेची स्थिति थोडीबहुत सुधारत गेल्यामुळें व उत्पादनांत होणाऱ्या वाढीमुळें, आर्थिक परिस्थिति सुधारल्यामुळें वरील प्रकारें कर्ज सहज उभारतां येईल. याचाच अर्थ असा कीं, ही पंचवार्षिक योजना यशस्वी करण्यासाठी सरकारला पैशाची अडचण पडणार नाहीं. कारण त्या योजनेचा दृष्टिकोन हळू हळू उत्पादन वाढवून आर्थिक परिस्थिति अगदीं अल्प प्रमाणांत सुधारणें असा आहे; म्हणजेच या पांच वर्षांत जनतेची व पर्यायानें देशाची पत सुधारूं शकेल.

हिंदमध्यें आर्थिक जीवनाच्या दृष्टीनें लहान शेतकरी, मोठाले जमीनदार, कामगारवर्ग (नोकरवर्ग, मजूरवर्ग धरून), थोडे श्रीमंत लोक व धंद्याचे मालक हे मुख्य घटक आहेत. किंमती स्थिर राहून पुढील दोन वर्षांत हळू हळू उतरत गेल्या म्हणजे त्या प्रत्येक वर्गामध्यें थोडें तरी चैतन्य निर्माण होऊं शकेल व तें पंचवार्षिक योजना यशस्वी करण्यासाठी मेरकशक्ती म्हणून उपयोगी पडेल.

'ईस्टर्न एकॉनॉमिस्ट'ची ही पंचवार्षिक योजना अगदीं वास्तवतेवर उभारलेली व पूर्णपणें व्यावहारिक स्वरूपाची दिसते. ती कृतींत उतरविणें अगदीं शक्य आहे. कमकुवत बनत जाणाऱ्या आर्थिक जीवनाला निश्चितपणें इष्ट असें निराळें वळण ही योजना देऊं शकेल असें वाटतें.

**युरोपमधील अमेरिकन प्रवासी**—१९५० सालापासून युरोपांत दरवर्षी ५,००,००० अमेरिकन प्रवासी सहल करण्यासाठी येतील आणि ते जवळ जवळ ६२,५०,००,००० डॉलर्स इतकी रकम दरवर्षी खर्च करतील असा अंदाज करण्यांत आला आहे. युरोपशीं आर्थिक बाबतींत सहकार्य करणाऱ्या अमेरिकन संघटनेच्या प्रवासविषयक खात्यानें वरील अंदाज केला आहे.

## रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया

### सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्टरांचा रिपोर्ट

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मध्यवर्ती बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचा ३० जून, १९४९ अखेरचा रिपोर्ट हातीं आला आहे, त्यावरून बँकेस अहवालाचे वर्षी एकूण उत्पन्न ११,६९,०८,०४८ रु. होऊन खर्च वजा जाता ९,०५,६९,७३१ रु. नफा झाल्याचें दिसून येतें. जून, १९४७ अखेर ८,०२,२७,३०९ रु. व जून, १९४८ अखेर १०,३८,२८,४२८ रु. नफा झाला होता. ४% सहामाही डिव्हिडंडसाठीं १० लक्ष रुपयांची तरतूद केल्यानंतर उरलेले ८,९५,६९,७३१ रु. मध्यवर्ती सरकारास मिळावयाचे आहेत. बोर्डाच्या रिपोर्टांत नेहेमीप्रमाणें अहवालाचे वर्षांतील बँकेच्या कारभाराची आर्थिक व बँकिंगविषयक माहिती देण्यांत आली आहे.

बँकिंग कंपनीज ॲक्टाच्या अंमलबजावणीच्या वाढलेल्या कामामुळें रिझर्व्ह बँकेच्या बँकिंग ऑपरेशन्सच्या खात्याचा पुष्कळच विस्तार झाला आहे. लायसेन्सकरितां येणारे अर्ज, कायद्याप्रमाणें बँकेकडे नोंदणीसाठीं येणारीं पत्रकें, तपासण्या, इत्यादिबाबत कामें वाढलीं आहेत. सरकारला व बँकांना सल्ला देण्याचें कामहि हें खातें करीत असतें. अहवालाचे वर्षी १६ बँका तपासण्यांत आल्या. १५८ नव्या शाखा–कचेऱ्या उघडण्यासाठी आलेल्या अर्जांपैकी ९५ शाखांचे अर्ज मंजूर करण्यांत आले. ८२ शाखांच्या स्थलांतरास परवानगी मागण्यांत आली, ती सर्वांस देण्यांत आली. १७ मे, १९४३ रोजीं डिफेन्स ऑफ इंडिया रूल ९४ अ अमलांत आला तेव्हांपासून जून १९४९ अखेर एकूण ११४७ अर्ज भांडवल उभारणीच्या व वाढीच्या परवानगीसाठी बँकेकडे आले. त्यांपैकीं ४५७ अर्जांच्या मान्यतेस शिफारस देण्यांत आली. अहवालाचे वर्षी आलेल्या ६४ अर्जांपैकी २० अर्जांच्या मान्यतेस बँकेनें शिफारस केली.

अहवालाचे वर्षी शेडयूल्ड बँकांचे यादींतून एक बँक गळाली व तीन बँका नव्यानें दाखल झाल्या. म्हणजे, शेडयूल्ड बँकांची संख्या १०१ झाली. खालील तक्त्यांत शेडयूल्ड बँकांची तुलनात्मक परिस्थिती दर्शविणारे आकडे दिले आहेत:—

( आकडे हजार रुपयांचे )

| | २ जुलै १९४८ | १ जुलै १९४९ | फरक (+) किंवा (−) |
|---|---|---|---|
| १ देणें (डिमांड) | ६९६,४९,३५ | ५९५,६७,५१ | −१००,८१,८४ |
| २ देणें (टाइम) | ३११,०८,०८ | २७९,५३,२२ | −३१,५४,८६ |
| ३ हातांत रोकड | ४०,१६,१७ | ४२,५८,६५ | +२,४२,४८ |
| ४ रिझर्व्ह बँकेजवळील शिलका | ७७,९२,६७ | ६६,४४,७९ | −११;४७,८८ |
| ५ कर्जें | ४३४,३१,९४ | ४४०,७०,५१ | +६,३८,५७ |
| ६ डिस्कौंट केलेलीं बिलें | १६,३९,०८ | १५,२०,३० | −१,१८,७८ |

एका वर्षाचे अवधींत बँकांकडील ठेवी १३२·३७ कोटी रुपयांनीं कमी झाल्या आहेत. मुख्यतः करंट खात्यांतीलें ठेवीच उतरल्या आहेत. शेडयूल्ड बँकांनीं दिलेल्या कर्जांची रकम ६ मे १९४९ रोजीं ४९६·८१ कोटी रुपयांवर गेली होती, ती १ जुलै रोजीं ४४०·७१ कोटी रुपये झाली. २६ बँकांना ( ३ प्रांतिक सहकारी बँका धरून ) रिझर्व्ह बँकेनें एकूण ५३ कोटी रुपयांचीं कर्जें दिलीं. गेल्या वर्षी फक्त २·२९ कोटींचीं कर्जें देण्यांत आलेलीं होतीं. शेडयूल्ड बँकांच्या कचेऱ्यांची संख्या ३४९० वरून ३००८ वर आली आहे, म्हणजे ४८२ शाखा बंद झाल्या आहेत. स्टेट बँक ऑफ पाकिस्तानच्या स्थापनेचा बव्हंशीं हा परिणाम आहे.

### दि कराड अर्बन को. बँक लि.. कराड

तपशीलवार आंकडे व माहिती, हें कराड अर्बन को. बँकेच्या रिपोर्टाचे वैशिष्ट्य असतें, त्याप्रमाणेंच ३० जून १९४९ अखेरचा अहवाल आहे. सभासदांची संख्या आतां ११७३ झाली आहे. गेल्या वर्षी भाग भांडवल ४,१२, ८८० रु. चें १,४१,७०० रु. झालें आहे. गंगाजळींत ५९,१०१ रु. असून इतर निधी १,०४,९६१ रुपयांचे आहेत. ठेवींत २ लाखांची वाढ होऊन त्यांची रक्कम २२,७५,४२१ रु. झाली आहे. बँकेच्या सभासद प्रॉव्हिडंट योजनेचें स्वागत चांगलें झालें आहे आणि इतर अनेक बँका अशा योजना करण्याच्या विचारांत आहेत असें समजतें. अहवालाचे सालीं बँकेस २१,०२८ रु. नफा झाला, त्यांतून ६¼% डिव्हिडंड देण्यास ८,८५६ रु. लागतील. अहवालावरून बँकेच्या तत्परतेच्या व कार्यक्षम कारभाराची, सामाजिक उपयुक्ततेची व चालकांच्या ध्येयवादाची उत्कृष्ट कल्पना येते. इतर अर्बन सहकारी बँकांनीं ह्या बँकेच्या अहवालाचा लक्षपूर्वक अभ्यास करावा, अशा योग्यतेचा तो आहे. चालकांच्या प्रगतिप्रियतेचे नमुने म्हणून कांहीं उदाहरणें येथें देता येतील. बँकेच्या सेवक मंडळींना नियामक मंडळाच्या सभासंचालनाचें निरीक्षणपूर्वक शिक्षण मिळावें म्हणून मॅ. डायरेक्टरांचे मदतनीस ह्या नात्यानें एकेका सेवकाला सभेच्या वेळीं प्रोसीडिंग बुकांत नोंदीचें काम करावयास संधी दिली. बँकेनें म. गांधी रा. स्मा. निधीस निव्वळ नफ्याच्या २०% अधिक रक्कम दिली. सहकारी सप्ताहांतील व्याख्यानानंतर आधारलेल्या प्रश्नांची पत्रिका तयार करून त्यांचीं उत्तरें लिहिणाऱ्या पहिल्या तीन अनुक्रमाच्या विद्यार्थ्यांना बक्षिसें देण्यांत आलीं. बँकेच्या सेवकांकरितां नियमावली करण्यांत आली. स्वस्त धान्याचीं दुकानें किफायतशीर चालविलीं. त्यांत नोकरी करणाऱ्या सेवक वर्गाला आर्थिक मदत दिली. स्वातंत्र्य दिन वैशिष्ट्यपूर्ण साजरा केला. दर मंगळवारीं ५०–५० सभासदांच्या अनौपचारिक बैठका घेण्यांत आल्या. स्थानिक नगरपालिकेला आलेली १ लक्ष रुपयांची तातडीची गरज कमिशन न घेतां आत्मीयतेनें पार पाडली. नोकरवर्गास व्यावहारिक तरतुदीपुरतें हिंदीचें ज्ञान व्हावें म्हणून हिंदीच्या वर्गाचा उपक्रम सुरू केला. थोडक्यांत म्हणजे, माणुसकी व कार्यक्षमता यांचें एकत्रीकरण बँकेच्या व्यवहारांत आढळतें. (चेअरमन : श्री. पु. पां. गोखले; मॅनेजर व मॅ. डायरेक्टर : श्री. सि. कृ. एकांडे.)

---

**अमेरिकेचें लष्करी अंदाजपत्रक**—अमेरिकेचे वरिष्ठ लष्करी अधिकारी पुढील वर्षाचें जुजबी अंदाजपत्रक तयार करण्यांत सध्या गुंतले आहेत. अंदाजपत्रकाप्रमाणें पुढील वर्षी लष्करावर १३७० कोटी डॉलर्स खर्च होतील. चालू हिशेबाच्या वर्षासाठी त्यांनीं लष्करी खर्चाचा जो आंकडा गृहीत धरला होता, त्यापेक्षां वरील रक्कम ३६० कोटी डॉलर्सनीं कमी आहे.

**बेकारीचा विमा**— बेकारी विषयक विमा फंडाची व्यवस्था सुचविणारी एक योजना हिंद सरकारच्या मजूर खात्यानें मध्यवर्ती सरकारच्या इतर सर्व खात्याकडे धाडली आहे. मध्यवर्ती प्रधान मंडळानें सरकारी नौकरांच्या पगारांत आणि पेन्शनमध्यें ५ टक्के कपात करण्याचा जो निर्णय नुकताच घेतला आहे, त्यामुळें ह्या योजनेला विशेष अर्थ प्राप्त झाला आहे. सर्व सरकारी नौकरांच्या पगारांतून रुपयांत अर्धा आणा कापून घेऊन वरील फंड उभारावा असें सुचविण्यांत आलें आहे. इतर खात्यांची ह्या योजनेला अनुकूलता दिसून आल्यास मजूर खातें अधिक तपशीलवार योजना आंखणार आहे असें समजतें. योजना तयार होण्यास दोन महिन्यांचा अवधी लागेल.

### पुणें जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि.

वरील बँकेकडे अहवालाचे वर्षी ४७,२५० रुपये मागणीचे १३ अर्ज आले. ७ नवीन कर्जें २,३०० रु. ची वांटण्यांत आली. एकूण ताळेबंद १८६८८८ रु. चा आहे. अहवालाचे वर्षी ३८० रु. नफा झाला. त्यामुळें ताळेबंदांत फक्त १५ रु. तोटा जिंदगीचे बाजूस दिसत आहे. मागील तोट्याचे रकमे इतकी रक्कम सहकारी खात्याकडून वृत्तांताचे वर्ष संपल्यावर बँकेकडे आली आहे. (चेअरमन: श्री. द्वा. वा. पोतदार, मॅनेजर: श्री. भ. ग. सावणे)

---

### श्री. आर. जी. सरय्या

इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीच्या सभासदांचीं नांवें जाहीर झालीं आहेत, त्यांत मुं. प्रां. सहकारी बँकेचे चेअरमन श्री. आर. जी. सरय्या ह्यांचें सहकारी बँकिंग प्रतिनिधी म्हणून नांव आहे.

---

### सन्मित्र को–ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., मुंबई ४

वरील बँकेची वार्षिक साधारण सभा रविवार ता. २५-९-१९४९ रोजीं दुपारीं ३-० वाजता (स्टँ. टा.) मुंबई येथें भरणार आहे.

---

### धी बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

## नोटीस

जाहीर करण्यांत येतें कीं, ह्या बँकेची ३८वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार ता. २४ सप्टेंबर १९४९ रोजीं दुपारीं २ वाजतां (स्टँ. टा.) तिच्या रजिस्टर्ड ऑफिसांत, (सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरीअल बिल्डिंग, ९, बेक हाऊस लेन, कोट, मुंबई,) खालील कामाकरितां भरविण्यांत येणार आहे.

१. ३० जून १९४९ रोजीं संपणाऱ्या वर्षाचें तपासलेलें ताळेबंद, नफातोटापत्रक व डिरेक्टरांचा रिपोर्ट स्वीकारणें.

२. नफ्याची वांटणी करणें व डिव्हिडंडचा दर ठरविणें.

३. पोट नियम २१ चे नंतर, खालील पोट नियम घालावा कीं नाहीं ह्याचा विचार करणें व योग्य वाटल्यास दाखल करून घेणें.

पोट नियम २१ (अ):—

> "सहकारी संस्थांना सामील होतां यावें म्हणून आणि / अथवा डायरेक्टरांच्या बोर्डाचे निवडणुकींत भाग घेण्याकरितां पोट नियम नंबर ६२ (अ) व (ई) अन्वयें लागणारी पात्रता येण्यासाठीं जरूर तेवढे भाग मिळवितां यावेत म्हणून मंजूर करण्याकरितां बोर्ड भागांचें भांडवल शिल्लक राखून ठेवील व मूळ किंमतीस किंवा बोर्ड ठरवील त्या जादा किंमतीस, पात्रता येण्यास लागणारे किमान भाग मंजूर करील; मात्र कोणत्याही संस्थेनें जर ह्या पोटनियमानुसार दिलेल्या सवलतीखालीं मिळविलेल्या भागांपैकीं कांहीं भाग विकले असतील वा वर्ग केले असतील तर ह्या सवलतीनुसार भाग मिळण्यास ती पात्र राहणार नाहीं."

४. ऑडिटर्स नेमून त्यांचें वेतन ठरविणें.

बोर्डाच्या हुकुमावरून,
व्ही. पी. वर्दे,
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

मुंबई
ता. २२–८–४९

भागांच्या तबदिलीचें काम (ट्रान्स्फर बुकें) १२ सप्टेंबर १९४९ ते २४ सप्टेंबर १९४९ पर्यंत (दोन्ही दिवस धरून) बंद राहील.

## दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

( स्थापना सन १९२७ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,७६,१०० रु. |
| भरलेलें भांडवल | १,०३,२५० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,१७,००० रु. |
| खेळतें भांडवल | ११,००,००० रु. |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागीदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. सोन्याचे तारणावर सवलतीचे व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक-हुंड्यांची खरेदी-विक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदी-विक्री व व्याज-वसुली वगैरे

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार
या बँकेमार्फत केले जातात.

ना. पां. ठाणेदार
मॅनेजर

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. २४८३ | " Cenoobank " | नं. ५११ |

**मुख्य कचेरीः—लक्ष्मी रोड, पुणें शहर.**

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुरामभाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

**जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर**

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर




## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.








हें पत्र पुणें, पेठ मांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गाधिवास ', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.